MHAH180001872014

## नियमित दिवाणी दावा नं.९७/२०१४

**राजू त्रिंबक वाघ**
**विरुध्द**
**बाळासाहेब पंढरीनाथ झुगे**

## नि.२९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश(order)-६-नियम(Rule)-१७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन मिळणेकामी दाखल केलेला आहे.

वादी यांचे कथन असे आहे की,

२. सदर दाव्यात त्यांनी नि.७ खाली दावा मिळाकतीची मोजणी होणेसाठी अर्ज दिला होता. त्याप्रमाणे नि.२८ वर उप अधिक्षक, भूमी अभिलेख, राहुरी यांनी अहवाल दाखल केलेला आहे. सदर अहवालानुसार वादी यांच्या मिळकतीमध्ये उत्तरेकडून त्रयस्थ इसम किसन केसु वाघ यांनी अतिक्रमण केल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी मोजणी होवून मिळणेकामी दाखल केला आहे तसेच अतिक्रमित क्षेत्र निश्चित होवून त्याचा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, सदर प्रकरणात त्रयस्थ इसम किसन केसु वाघ यांना समाविष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे तसेच त्या अनुषंगाने वादी यांच्या मुळ दाव्यातील मागणीमध्येही बदल करणे आवश्यक आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही. सदरचा दावा हा नैमित्तीक न्याय तत्वानुसार निकाली होणेस सदर दुरुस्तीने मदतच होणार आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर व्हावा अशी विनंती केलेली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जावर माझे पूर्वाधिकारी यांनी संभाव्य प्रतिवादी यांना नोटीस काढून त्यांचे म्हणणे मागविले आहे. संभाव्य प्रतिवादी या दाव्यात हजर होवून त्यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावरच दिलेले आहे. संभाव्य प्रतिवादी किसन केसु वाघ यांचे म्हणणे असे आहे की, प्रस्तुतचे दाव्यामध्ये सदर प्रतिवादीविरुध्द कोणतीही मागणी वादी यांनी केलेली नाही. दाव्यास कारण दि.२०/०१/२०१४ रोजी घडलेले आहे. त्यावेळेस प्रतिवादी क्र.६ यांनी दावा मिळकतीच्या बांधाची मोडतोड केलेली नाही व अतिक्रमण केलेले नाही. त्यामुळे मुळ दाव्यातील कारणावरुन सदर संभाव्य प्रतिवादीस दाव्यात समाविष्ट करता येणार नाही.

५. अर्जाचे अवलोकन केले. म्हणणे वाचले. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. नि.२८ वरील उप-अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्या अहवालाचे अवलोकन केले. दाव्याचे अवलोकन केले. वरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, संभाव्य प्रतिवादी यांनी वादी यांच्या मिळकतीत उत्तरेकडून अतिक्रमण केलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीस त्याची मिळकत गट नं.१०९/१ब या मिळकतीची मोजणी होवून अतिक्रमण झाले असल्यास त्याचा ताबा देण्यात यावा अशा स्वरुपाचा दाखल केलेला आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस संभाव्य प्रतिवादी किसन केसु वाघ यांनी अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सदरच्या संभाव्य प्रतिवादी यांना सदर दाव्यात समाविष्ट करणे तसेच त्या अनुषंगाने असलेल्या इतर दुरुस्ती दाव्यात करणे गरजेचे असल्याचे दिसून येत आहे.

६. वरील सर्व बाबींचा विचार करता, दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होणेकामी प्रस्तुतचे संभाव्य प्रतिवादी यांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे असल्याचे दिसून येते. तसेच, मिळकतीविषयी भविष्यात अनेक दावे दाखल होवू नयेत या दृष्टीनेही सदरच्या संभाव्य प्रतिवादी यांना दाव्यामध्ये समाविष्ट करणे तसेच त्या अनुषंगाने असलेल्या इतर दुरुस्ती दाव्यात करणे गरजेचे आहे. प्रस्तुतच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आ दे श

(१) सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

(२) वादी यांनी अर्जामध्ये नमुद केलेली दुरुस्ती ही सदर आदेशापासून १४ दिवसांचे आत करण्यात यावी तसेच सदर दाव्याची दुरुस्तीची प्रत तातडीने दाखल करावी.

ठिकाण – राहुरी. (ए.एस.वाडकर)
दिनांक - ०५/१०/२०२१. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, राहुरी.